14 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# विद्यापीठ स्वच्छ पाण्याबाबत स्वयंपूर्ण

## रिव्हर्स ऑस्मॉसिस तंत्रज्ञानाचा वापर : जलशुद्धिकरण प्रकल्पाचे आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन

कोल्हापूर : रिव्हर्स ऑस्मॉसिस (आर. ओ.) तंत्रज्ञानावर आधारित जलशुद्धिकरण, बॉटलिंग प्रकल्पाचा प्रारंभ शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी झाला. या प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यापीठ आता स्वच्छ पाण्याबाबत स्वयंपूर्ण बनले आहे.

या प्रकल्पाचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी अकरा वाजता कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी आयुक्त पी. शिवशंकर म्हणाले, जलयुक्त विद्यापीठ, वृक्षारोपण मोहीम, स्वच्छ भारत, मतदार जागृती, बेटी बचाओ अभियान अशा प्रत्येक उपक्रमात शिवाजी विद्यापीठ हिरिरीने अग्रभागी राहिले आहे. जलशुद्धिकरण प्रकल्प उभारून विद्यापीठ स्वच्छ पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले आहे. स्वच्छ पाणी हा सर्वांचा हक्क आहे, असे आपण म्हणत असलो तरी, विद्यापीठाने त्या दिशेने टाकलेले पाऊल अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. संशोधनासह त्याच्या उपयोजनातही विद्यापीठ अग्रेसर असल्याची प्रचिती या प्रकल्पाच्या माध्यमातून आली आहे.



« शिवाजी विद्यापीठात जलशुद्धिकरण व बॉटलिंग प्रकल्पाचा प्रारंभ शुक्रवारी महानगरपालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शेजारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.

### प्रत्येक घटकाला मिळणार शुद्ध पाणी

- विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाने निर्धारित मुदतीपेक्षा कमी कालावधीत या प्रकल्पाची उभारणी करुन तो कार्यान्वित केला आहे. सुमारे ५००० लिटर प्रतितास इतकी उच्च शुद्धिकरण क्षमता असलेला हा प्रकल्प विद्यापीठाने स्वनिधीतून १७ लाख ५० हजार रुपयांत उभारला आहे.
- या जलशुद्धिकरण यंत्रणेसह सेमी-ऑटोमॅटिक प्रकारातील बॉटलिंग प्लँटही उभारण्यात आलेला आहे. या प्रकल्पाद्वारे विद्यापीठातील प्रत्येक घटकाला शुद्ध पाण्याची हमी मिळणार असल्याचे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी यावेळी सांगितले.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठाच्या प्रत्येक घटकाला समान आणि चांगल्या दर्जाचे पाणी मिळावे, यासाठी हा प्रकल्प उभारला आहे. यापुढे विद्यापीठातील अधिविभाग, प्रशासकीय विभाग, अतिथिगृह, कँटीन, वसतिगृहे आणि कॅम्पसमध्ये राहणाऱ्या परिवारांनाही या प्रकल्पातून शुद्ध पाणी पुरविण्यात येणार आहे.

कार्यक्रमात प्रकल्पाचे चालक वैभव कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्रभारी परीक्षा नियंत्रक जी. आर. पळसे उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. उपकुलसचिव डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

14 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# शासकीय योजनात विद्यापीठाचे मोलाचे योगदान

## आयुक्त पी. शिवशंकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
विविध शासकीय योजना आणि उपक्रमांच्या अंमलबजावणीत शिवाजी विद्यापीठ परिवाराचे सकारात्मक योगदान कौतुकास्पद आहे, असे उदगार कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांनी येथे काढले.

शिवाजी विद्यापीठाने उभारलेल्या नूतन रिव्हर्स ऑस्मॉसिस (आर.ओ.) पद्धतीच्या जलशुद्धीकरण व बॉटलिंग प्रकल्पाचे उद्घाटन शिवशंकर यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

शिवशंकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे शासनाला सदैव सहकार्य लाभले आहे. जलयुक्त विद्यापीठ मोहिमेची अंमलबजावणी असो, वृक्षारोपण मोहीम असो की स्वच्छ भारत, मतदार जागृती वा बेटी बचाओ अभियान असो, प्रत्येक उपक्रमात विद्यापीठ हिरिरीने अग्रभागी राहिले आहे. आतासुद्धा आर.ओ. जलशुद्धीकरण प्रकल्प उभारून विद्यापीठ स्वच्छ पाण्याच्या बाबतीतही स्वयंपूर्ण झाले आहे. स्वच्छ पाणी हा सर्वांचा हक्क आहे, असे आपण म्हणत असलो तरी विद्यापीठाने त्या दिशेने टाकलेले पाऊल अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. संशोधनाबरोबरच त्याच्या उपयोजनांतही विद्यापीठ अग्रेसर असल्याची प्रचिती या प्रकल्पाच्या माध्यमातून आल्याचेही त्यांनी नमूद केले.



विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाने निर्धारित मुदतीपेक्षा कमी कालावधीत या प्रकल्पाची उभारणी करून तो कार्यान्वित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, आर.ओ. जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यामागे एक महत्त्वाचे कारण आहे, ते म्हणजे पाण्यावर सर्वांचा समान हक्क आहे आणि सर्वांना एकसारखेच शुद्ध पाणी मिळायला हवे, अशी भूमिका त्यामागे आहे. विद्यापीठाच्या कुलगुरूंपासून ते कर्मचाऱ्यांपर्यंत आणि विद्यार्थ्यांना अशा सर्वांनाच समान आणि चांगल्या दर्जाचे पाणी मिळावे, यासाठी हा प्रकल्प उभारला आहे. यापुढे विद्यापीठातील अधिविभाग, प्रशासकीय विभाग, अतिथीगृह, कॅन्टीन, वसतिगृहे इतकेच नव्हे, तर अगदी कॅम्पसवर राहणाऱ्या परिवारांनासुद्धा या प्रकल्पातून शुद्ध पाणी पुरविण्यात येणार आहे.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, सुमारे ५००० लिटर प्रतितास इतकी उच्च शुद्धीकरण क्षमता असलेला हा प्रकल्प विद्यापीठाने स्वनिधीतून १७.५० लाख रुपयांत उभारला आहे. या जलशुद्धीकरण यंत्रणेबरोबरच सेमी-ऑटोमेटिक प्रकारातील बॉटलिंग प्लान्टही उभारण्यात आलेला आहे. या प्रकल्पाद्वारे विद्यापीठातील प्रत्येक घटकाला शुद्ध पाण्याची हमी मिळणार आहे.

यावेळी या प्रकल्पाचे ऑपरेटर वैभव कुलकर्णी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपकुलसचिव डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी आभार मानले. प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्रभारी परीक्षा नियंत्रक जी. आर. पळसे यांच्यासह बिल्डिंग वर्क्स कमिटीचे पदाधिकारी व सदस्य तसेच शिक्षक उपस्थित होते.

14 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# स्कीलबेस्ड डेव्हलपिंग प्रोग्रॅम राबवू

Maruti.Patil
@timesgroup.com
Tweet : @MarutipatilMT

खासगी संस्थेत काम करताना शिकण्याची भरपूर संधी असते, पण काम मात्र संस्थाचालकांच्या निर्देशानुसार करावे लागते. सरकारी संस्थांमध्ये दिलेली गाइड लाइन आणि सिस्टीममध्ये काम करावे लागते. त्यामुळे काम करण्याची मोठी संधी आहे. राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या निमित्ताने पहिलीच संधी प्राप्त झाली आहे. नोटाबंदीच्या निर्णयानंतर शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व परीक्षा विभागाने सुमारे ९५ टक्के काम कॅशलेसद्वारे सुरू केले आहे. या जोरावरच विद्यापीठाचा कारभार डिजिटायझेशन करण्यावर भर देणार आहे. पेपर लेस कार्यालयापेक्षा लेस पेपरवर भर देणाच्या मानस शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव **डॉ. विलास नांदवडेकर** यांनी व्यक्त केला.



**टॉक टाइम**

**■ राष्ट्रीय यूथ फेस्टिव्हलची तयारी कशी सुरू आहे ?**

▶ शिवाजी विद्यापीठाला आठ वर्षांनंतर राष्ट्रीय युवा महोत्सव आयोजनाची जबाबदारी मिळाली आहे. देशपातळीवरील दीड हजार विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहेत. महोत्सवाचे काटेकोर नियोजन करण्यासाठी २२ समिती स्थापन केल्या असून, त्यांच्या बैठकाही सुरू झाल्या आहेत. महोत्सवामध्ये सहभागी होणार विद्यार्थी, परीक्षक यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था केली आहे. विद्यापीठातील वसतिगृह, गेस्ट हाउस याबरोबरच राजाराम व कृषी कॉलेजच्या वसतिगृहाची मागणी करण्यात येणार आहे.

**■ कर्मचाऱ्यांचे प्रश्न कसे सोडवणार ?**

▶ विद्यापीठस्तरावरील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची ४० टक्के निर्गत झाली आहे. प्रशासन आणि कर्मचारी यांच्यात सलोख्याचे संबंध निर्माण करण्यासाठी प्राधान्य देण्यात येत आहे. शासनस्तरावरील मागण्यांसाठी अध्यादेशांचा सखोल अभ्यास करून उच्चशिक्षण विभागाचे सहसंचालक यांच्याशी चर्चाही झाली आहे. कुलगुरू, बीसीयूडी, वित्त व लेखाधिकारी यांच्याशी चर्चा झाली आहे. शिक्षण सहसंचालक कार्यालयात कँप घेण्यात येणार आहे. त्यामध्ये विद्यापीठातील अधिकारीही सहभागी होणार आहेत. त्यानंतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी पॅनेलची निर्मिती करून त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या जातील. त्यामुळे विद्यापीठ व कर्मचाऱ्यांमध्ये संघर्ष निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. त्यादृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहेत.

**■ कॅशलेस व्यवहारासाठी काय उपाययोजना केल्या ?**

▶ २०१० मध्ये वित्त विभागाने कॅशलेस व्यवहारासाठी सुरुवात केली होती. त्यानंतर परीक्षा विभागानेही यामध्ये आघाडी घेतली, त्यामुळे या दोन विभागांचे ९५ टक्के काम कॅशलेस व्यवहाराद्वारे होत आहे. त्यामुळे इतर विभागांमध्ये कॅशलेस व्यवहार होण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. विद्याशाखा विभाग, मेस, कँटिंग या विभागांसोबत बैठक घेऊन तशा सूचना दिल्या आहेत. काही तांत्रिक अडचणी आहेत, त्या दूर होतील. विद्यापीठातील कॅशलेस व्यवहारासाठी अॅक्सेस बँकेने स्वाइप मशिन देण्याचे मान्य केले आहे. विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये नोटाबंदी निर्णयानंतर झालेल्या सेमिनार, वर्कशॉप, परिषदेतील सहभागी लोकांना कॅशलेसद्वारा पेमेंट केले आहे.

**■ विद्यापीठाची सुरक्षा कशी राखणार ?**

▶ विद्यापीठ परिसरातील विशेषत: विद्यार्थिनी व सीनिअर सिटिझन्स यांची काळजी घेण्यासाठी विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाला जादा पेट्रोलिंग करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सुरक्षा विभागामध्ये नुकतीच ग्रीन कारचा समावेश झाला आहे, त्यामुळे या कारद्वारे पेट्रोलिंग करणे सुलभ होणार आहे. विद्यापीठाचा परिसर मोठा असला, तरी सीसीटीव्हीद्वारे वॉच ठेवण्यासाठी सर्व विभागांना परिपत्रक काढून त्यांची मागणी करण्याचे आदेश दिले आहेत. पण त्यापूर्वी विद्यापीठाच्या चार प्रवेशद्वारांवर सीसीटीव्हीचा वॉच राहणार आहे. त्यातून विद्यापीठाची सुरक्षा अधिक भक्कम केली जाईल.

**■ ड्रीम प्रोजेक्ट कोणते आहेत?**

▶ पुढील पाच वर्षांचे नियोजन करून विद्यार्थीकेंद्रित धोरणाचा अवलंब करत पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट रोजगार व व्यवसाय निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. त्यासाठी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या मदतीने पायाभूत सुविधा देण्यात येणार आहेत. पेपर लेस कार्यालयापेक्षा लेस पेपर संकल्पना वापरून विद्यापीठाचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. यासाठी डॉक्युमेंट ट्रेकिंग, रेकॉर्ड ट्रेकिंग, ऑनलाइन लायब्ररी, आदींना प्राधान्य देणार आहे. विद्यापीठाचे नॉन टीचिंग कर्मचारी चांगले आहेत. त्यांना अधिक स्कीलबेस्ड करण्यासाठी डेव्हलपिंग प्रोग्रॅम राबवण्यात येणार आहे.

14 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

**आदिनारायण कलानिधी : शिवाजी विद्यापीठामध्ये 'नॅक'विषयक राष्ट्रीय परिषदेला प्रारंभ**

# शिक्षण प्रणालीतील बदलाचे आव्हान





शिवाजी विद्यापीठ व केआयटी महाविद्यालयातर्फे शुक्रवारी आयोजित 'नॅक'विषयक राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. आदिनारायण कलानिधी यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या छायाचित्रात कार्यक्रमासाठी डॉ. एम. एम. मुजुमदार, आर. के. कामत, साजिद हुदली, डी. आर. मोरे, व्ही. व्ही. कार्जिन्नी उपस्थित होते.

**कोल्हापूर** : अभ्यासक्रम आणि शैक्षणिक प्रणालीमध्ये बदल करणे हे आपल्या यंत्रणेपुढील मोठे आव्हान आहे. आधुनिकतेची कास धरताना आपल्याला प्रथम शिक्षण पद्धती बदलण्यासह जुन्या अभ्यासक्रमांचे सभोवतालच्या उद्योगांशी सुसंगत असे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन चेन्नईच्या अण्णा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. आदिनारायण कलानिधी यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आणि केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'बीसीयूडी' संचालक डॉ. डी. आर. मोरे होते. 'नॅक पुरस्कृत मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थांवर होणारा परिणाम' असा या परिषदेचा विषय आहे. डॉ. कलानिधी म्हणाले, जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी देशाच्या शैक्षणिक प्रणालीमध्ये बदल आवश्यक आहे. शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्त्यांनी समयसूचकता राखून शिक्षणक्षेत्राला दिशा देण्याची गरज आहे. आज शिक्षणक्षेत्रासह विविध उद्योग-व्यवसायांत कार्यरत असणाऱ्यांनी काळानुरुप बदलत्या, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. आपल्याकडील बरीचशी महाविद्यालये आणि विद्यापीठे शासनाच्या अनुदानावर अवलंबून असल्यामुळे मोठ्या संकटात सापडलेली आहेत. विद्यार्थ्यांना नोकऱ्या उपलब्ध होत नसल्यामुळे महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण घटत आहे.

डॉ. मोरे म्हणाले, विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या आधारावर विद्यार्थ्यांच्या रोजगाराचे प्रमाण ठरते. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांनी नवतंत्रज्ञान सातत्याने आत्मसात करणे आवश्यक आहे.

कार्यक्रमात 'केआयटी'चे सचिव साजिद हुदली यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. उपप्राचार्य डॉ. एम. एम. मुजुमदार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. एस. एस. माने यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

## उत्तम दर्जाच्या शिक्षकांची गरज



केंद्र सरकार 'नॅक'च्या माध्यमातून देशभरातील विद्यापीठांचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करीत आहे, असे डॉ. कलानिधी यांनी सांगितले. ते म्हणाले, या माध्यमातून आपणाला विद्यापीठ, महाविद्यालयांमध्ये उच्च गुणवत्ता प्राप्तीसाठी होत असलेले प्रयत्न लक्षात येतात. विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देणाऱ्या उत्तम दर्जाच्या शिक्षकांची आज मोठी गरज निर्माण झाली आहे.

14 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# शैक्षणिक प्रणालीत आमूलाग्र बदल आवश्यक

## माजी कुलगुरू डॉ. कलानिधी : शिवाजी विद्यापीठात 'नॅक' मूल्यांकनाबाबत राष्ट्रीय परिषद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १३ : जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी देशाच्या शैक्षणिक प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल आवश्यक असून, शिक्षणतज्ज्ञांनी, धोरणकर्त्यांनी समयसूचकता राखून शिक्षण क्षेत्राला दिशा देण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन चेन्नईच्या अण्णा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आदिनारायण कलानिधी यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठ व केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नॅक पुरस्कृत मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थांवर होणारा परिणाम' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



अध्यक्षस्थानी बीसीयूडीचे संचालक डॉ. डी.आर. मोरे होते.

डॉ. कलानिधी म्हणाले, "आज शिक्षण क्षेत्रासह विविध उद्योग-व्यवसायांत कार्यरत असणाऱ्यांनी काळानुरूप बदलत्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. अभ्यासक्रम आणि शैक्षणिक प्रणालीमध्ये बदल करणे हे आपल्या यंत्रणेपुढील मोठे आव्हान आहे. आधुनिकतेची कास धरताना आपल्याला प्रथम शिक्षणपद्धती बदलण्याबरोबरच जुन्या झालेल्या अभ्यासक्रमांचे सभोवतालच्या उद्योगांशी सुसंगत असे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. आपल्याकडील बरीचशी महाविद्यालये आणि विद्यापीठे शासनाच्या अनुदानावर अवलंबून असल्यामुळे मोठ्या संकटात सापडलेली आहेत. विद्यार्थ्यांना नोकऱ्या उपलब्ध होत नसल्यामुळे महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण घटत आहे."

> **भारत सरकार 'नॅक'च्या माध्यमातून विद्यापीठांचे मूल्यांकन करते. या माध्यमातून आपणाला विद्यापीठांमध्ये तसेच महाविद्यालयांमध्ये उच्च गुणवत्ता प्राप्तीसाठी होणारे प्रयत्न लक्षात येतात. शैक्षणिक केंद्रांना समाजात चांगला लौकिक प्राप्त होतो. विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देणाऱ्या उत्तम दर्जाच्या शिक्षकांची आज गरज निर्माण झालेली आहे.**
>
> **- डॉ. आदिनारायण कलानिधी**
> माजी कुलगुरू, अण्णा विद्यापीठ, चेन्नई

डॉ. मोरे म्हणाले, "विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या आधारावर विद्यार्थ्यांच्या रोजगाराचे प्रमाण ठरते. त्यामुळे शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी नवतंत्रज्ञान सातत्याने आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यापीठांची प्रतिष्ठा महाविद्यालयांच्या प्रतिष्ठेवर अवलंबून असते; तसेच विद्यापीठाच्या शिक्षणाचा दर्जा हा महाविद्यालयांच्या शैक्षणिक दर्जावर अवलंबून असतो."

केआयटीचे सचिव साजिद हुदली यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. केआयटीचे उपप्राचार्य डॉ. एम. एम. मुजुमदार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. एस. एस. माने यांनी आभार मानले.

1

14 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# स्पर्धेत टिकण्यासाठी शिक्षणप्रणालीत बदल आवश्यक


## डॉ.आदिनारायण कलानिधी यांचे प्रतिपादन : विद्यापीठ व केआयटीतर्फे परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी देशाच्या शैक्षणिक प्रणालीमध्ये आमुलाग्र बदल आवश्यक आहे. शिक्षणतज्ज्ञांनी, धोरणकर्त्यांनी समयसुचकता राखून शिक्षण क्षेत्राला दिशा देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन चेन्नईच्या आण्णा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. आदिनारायण कलानिधी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ व के. आय. टी. अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नॅक पुरस्कृत मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थावर होणारा परिणाम' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद झाली. याच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात ही परिषद झाली. अध्यक्षस्थानी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे होते.

यावेळी डॉ. कलानिधी म्हणाले, आज शिक्षण



क्षेत्रासह विविध उद्योग-व्यवसायांत कार्यरत असणाऱ्यांनी काळानुरुप बदलत्या अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. अभ्यासक्रम आणि शैक्षणिक प्रणालीमध्ये बदल करणे हे आपल्या यंत्रणेपुढील मोठे आव्हान आहे. आपल्याकडील बरीचशी महाविद्यालये आणि विद्यापीठे शासनाच्या अनुदानावर अवलंबून असल्यामुळे मोठ्या संकटात सापडलेली आहेत. नोकऱ्या उपलब्ध होत नसल्यामुळे महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण घटत आहे.

ते म्हणाले, भारत सरकार 'नॅक'च्या माध्यमातून देशभरातील विद्यापीठांचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करीत आहे. विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देणाऱ्या उत्तम दर्जाच्या शिक्षकांची आज मोठी गरज निर्माण झालेली आहे.

डॉ. डी.आर. मोरे म्हणाले, शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी नवतंत्रज्ञान सातत्याने आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यापीठांची प्रतिष्ठा महाविद्यालयांच्या प्रतिष्ठेवर अवलंबून असते. तसेच, विद्यापीठाच्या शिक्षणाचा दर्जा हा महाविद्यालयांच्या शैक्षणिक दर्जावर अवलंबून असतो.

यावेळी के. आय. टी. चे सचिव साजिद हुदली यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. के. आय. टी. चे उपप्राचार्य डॉ. एम. एम. मुजुमदार यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्रा. एस. एस. माने यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 JAN 2017

पुढारी

# शैक्षणिक प्रणालीमध्ये आमूलाग्र बदलाची आवश्यकता

## डॉ. कलानिधी : शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी देशाच्या शैक्षणिक प्रणालीमध्ये आमूलाग्र बदलाची आवश्यकता असल्याचे मत चेन्नईच्या आण्णा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आदिनारायण कलानिधी यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ व के.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नॅक पुरस्कृत मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थांवर होणारा परिणाम' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन डॉ. कलानिधी यांच्या हस्ते झाले. यावेळी बीजभाषण करताना ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. कलानिधी म्हणाले, आज शिक्षण क्षेत्रासह विविध उद्योग-व्यवसायांत कार्यरत असणाऱ्यांनी काळानुरूप बदलत्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. अभ्यासक्रम आणि शैक्षणिक प्रणालीमध्ये बदल करणे हे आपल्या यंत्रणेपुढील मोठे आव्हान आहे. आधुनिकतेची कास धरताना आपल्याला प्रथम शिक्षणपद्धती बदलण्याबरोबरच जुन्या झालेल्या अभ्यासक्रमांचे सभोवतालच्या उद्योगांशी सुसंगत असे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. आपल्याकडील बरीचशी महाविद्यालये आणि विद्यापीठे शासनाच्या अनुदानावर अवलंबून असल्यामुळे मोठ्या संकटात सापडलेली आहेत. विद्यार्थ्यांना नोकऱ्या उपलब्ध होत नसल्यामुळे महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण घटत आहे. त्यामुळे शिक्षणतज्ज्ञांनी, धोरणकर्त्यांनी समयसुचकता राखून शिक्षण क्षेत्राला दिशा देण्याची गरज आहे. बीसीयुडी संचालक डॉ. मोरे म्हणाले, शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी नवतंत्रज्ञान सातत्याने आत्मसात करणे आवश्यक आहे. यावेळी के.आय.टी.चे सचिव साजिद हुदली यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर.के. कामत यांनी प्रास्ताविक केले.

प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. कार्जिनी यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. के.आय.टी. चे उपप्राचार्य डॉ. एम.एम. मुजुमदार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा.एस.एस. माने यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठासह के.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14 JAN 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# स्पर्धेत टिकण्यासाठी शैक्षणिक प्रणालीत बदल आवश्यक

## – आदिनारायण कलानिधी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी देशाच्या शैक्षणिक प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल आवश्यक आहे. शिक्षणतज्ज्ञांनी, धोरणकर्त्यांनी समयसूचकता राखून शिक्षण क्षेत्राला दिशा देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन चेन्नईच्या विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आदिनारायण कलानिधी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ व केआयटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नॅक पुरस्कृत मूल्यांकन व परीक्षणाचा उच्च शैक्षणिक संस्थांवर होणारा परिणाम' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषण करताना डॉ. कलानिधी बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. कलानिधी म्हणाले, शिक्षण क्षेत्रासह विविध उद्योग-व्यवसायांत कार्यरत असणाऱ्यांनी काळानुरूप बदलत्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. अभ्यासक्रम आणि शैक्षणिक प्रणालीमध्ये बदल करणे हे आपल्या यंत्रणेपुढील मोठे आव्हान आहे. आधुनिकतेची कास धरताना आपल्याला प्रथम शिक्षणपद्धती बदलण्याबरोबरच जुन्या झालेल्या अभ्यासक्रमांचे सभोवतालच्या उद्योगांशी सुसंगत असे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे.

ते म्हणाले, भारत सरकार 'नॅक'च्या माध्यमातून देशभरातील विद्यापीठांचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करत आहे. या माध्यमातून आपणाला विद्यापीठांमध्ये तसेच महाविद्यालयांमध्ये उच्च गुणवत्ता प्राप्तीसाठी होत असलेले प्रयत्न लक्षात येतात. विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देणाऱ्या उत्तम दर्जाच्या शिक्षकांची मोठी गरज निर्माण झालेली आहे.


**कोल्हापूर : राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना चेन्नईच्या विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आदिनारायण कलानिधी.**

यावेळी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, केआयटीचे सचिव साजिद हुदली यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य व्ही. व्ही. कार्जिनी यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. केआयटीचे उपप्राचार्य एम. एम. मुजुमदार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. एस. एस. माने यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठासह केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# शिक्षणाच्या माध्यमातूनच जागतिक परिवर्तन

## डॉ. पी. कन्नान : 'आधुनिक भारताच्या विकासात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची प्रस्तुतता' या विषयावर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचे चक्र गतिमान करणे शक्य असते आणि त्यातूनच जागतिक परिवर्तन घडवता येते असे प्रतिपादन विजापूर (कर्नाटक) येथील राज्य महिला विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागप्रमुख व डॉ.बांबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. पी. कन्नान यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आधुनिक भारताच्या विकासात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची प्रस्तुतता' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन झाले. या चर्चासत्राच्या बीजभाषणात ते बोलत होते. हे चर्चासत्र अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात झाले. अध्यक्षस्थानी बीसीयुडीचे संचालक डॉ. डी.आर. मोरे होते.

डॉ. कन्नान म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिवर्तनाचे विविध प्रवाह समजून घेण्याकरिता आयुष्यातील बहुतेक वेळ विद्या अभ्यासात घालविला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय चर्चासत्रात स्मरणिकेचे प्रकाशन करताना डॉ. पी. कन्नान. सोबत डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. बसवराज बन्नी आदी.

आणि त्यातूनच परिवर्तनासाठी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे सबलीकरण करणे ही महत्त्वाची गरज असल्याचे त्यांचे मत बनले होते. बाबासाहेबांनी आपल्या लिखाणातून भारताच्या खऱ्या सामाजिक इतिहासावर प्रकाशझोत टाकला आहे. बिनतोड युक्तीतवादांसह त्यांनी केलेल्या सैद्धांतिक मांडणीला आजही पर्याय नाही. पूर्वीच्या काळी सर्वांना शिक्षण घेणे शक्य नव्हते अशा विषमतेच्या परिस्थितीत त्यांनी केलेले सामाजिक, आर्थिक न्यायावरील कार्य फार महान आहे. अठरा-अठरा तास अभ्यास करणारे सर्जनशील वाचक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. अर्थशास्त्राच्या प्रत्येक शाखेत त्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. डी.आर. मोरे म्हणाले, ज्ञानाची ताकद काय असते, हे जगाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. संविधानाच्या माध्यमातून इथल्या प्रत्येक नागरिकाला शिक्षणाचा हक्क प्राप्त करून दिला. त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहण्यासाठी शिक्षण हा एकमेव स्त्रोत आहे, हे लक्षात घेऊन राज्य व केंद्र सरकार सातत्याने पुढाकार घेऊन प्रयत्न करीत आहे.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक एस.टी. कोंबडे यांनी आभार मानले. यावेळी बल्लारी विद्यापीठाचे बसवराज एस. बन्नी, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, डी. एम. भंडारी, डॉ. प्रविण के. जाधव, डॉ. आर. जी. दांडगे, विविध राज्यांतील शिक्षक, संशोधक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JAN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'शिक्षणातून जागतिक परिवर्तन'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचे चक्र गतिमान करणे शक्य असते आणि त्यातूनच जागतिक परिवर्तन घडवून आणता येते,' असे प्रतिपादन विजापूर (कर्नाटक) येथील राज्य महिला विद्यापीठाचे इंग्रजी अधिविभागप्रमुख तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. पी. कन्नान यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त 'आधुनिक भारताच्या विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची प्रस्तुतता' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे बीजभाषण करताना डॉ. कन्नान बोलत होते. अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी बीसीयूडी तथा प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. कन्नान म्हणाले, 'बाबासाहेबांनी आपल्या लिखाणातून भारताच्या खऱ्या सामाजिक इतिहासावर प्रकाशझोत टाकला आहे. बिनतोड युक्तीवादांसह त्यांनी केलेल्या सैद्धांतिक मांडणीला आजही पर्याय नाही. अर्थशास्त्राच्या प्रत्येक शाखेत त्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे.'

अध्यक्षीय भाषणात डॉ. मोरे म्हणाले, 'ज्ञानाची ताकद काय असते, हे जगाला बाबासाहेबांनी आपल्या कार्यातून दाखवूंन दिले. संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला.'

अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी सूत्रसंचालन केले. एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले. *बल्लारी विद्यापीठाचे बसवराज एस. बन्नी,* ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, डी. एम. भंडारी, डॉ. प्रवीण के. जाधव, डॉ. आर. जी. दांडगे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JAN 2017
तरुण भारत

# पदवीस्तरीय आविष्कार स्पर्धा उत्साहात

- स्पर्धेत ३६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला
- मराठवाडा विद्यापीठात २७ व २९ जानेवारी रोजी होणार राज्यस्तरीय स्पर्धा
- शिवाजी विद्यापीठाचे ४८ स्पर्धक सहभागी होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांतून निवड झालेल्या पदवीस्तरीय आविष्कार मध्यवर्ती संशोधन स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. लोककला केंद्रात झालेल्या या स्पर्धेमध्ये स्पर्धेत ३६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

या स्पर्धेत विजयी झालेले १२ पदवीस्तरीय विद्यार्थी व पदव्युत्तर, पदव्युत्तरोत्तर शिक्षक विभागातून ३६ असे एकूण ४८ स्पर्धक नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात २७ ते २९ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होतील. दरम्यान, या स्पर्धेचा समारोप समारंभ अभियांत्रिकी विद्याशाखेचे समन्वयक डॉ. एस. एच. सावंत, प्रा. डॉ. जे. पी. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट विभागाने या मध्यवर्ती आविष्कार समारंभाचे यजमानपद भूषविले. यावेळी बी.सी.यु.डी.चे संचालक डॉ. डी. आर. मोरे, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, आविष्कारचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JAN 2017
लोकमत

# विद्यापीठाकडून 'डिजिटल' प्रमाणंपत्र वितरणाचा प्रारंभ

**कोल्हापूर :** विविध विद्याशाखांतर्गत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय परिषद, चर्चासत्रांमधील प्रमाणपत्र डिजिटल स्वरूपात वितरण करण्याची प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाने शुक्रवारपासून सुरु केली. हिंदी विभागाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी या ऑनलाईन प्रक्रियेचे उद्घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

हिंदी विभागातर्फे 'प्रवासी हिंदी साहित्य आणि मानवाधिकार' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. यात प्रमाणपत्र डिजिटल स्वरुपात वितरित करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विवेक शंकर आदेश, आदी उपस्थित होते. डॉ. रवींद्र भोरे यांनी सूत्रसंचालन , तर प्रदीप लाड यांनी आभार मानले. समारोपप्रसंगी प्रा. जी. गोपीनाथन यांनी प्रवासी हिंदी साहित्य आणि मानव अधिकारांची संकल्पना स्पष्ट केली. विविध चार सत्रांमध्ये ही परिषद घेण्यात आली, अशी माहिती हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्मा पाटील यांनी दिली. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

## वि. स. खांडेकर यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्यावतीने मराठी भाषेतील पहिले ज्ञानपीठ विजेते वि. स. खांडेकर यांच्या ११९ व्या जयंतीदिनी अभिवादन केले. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जयंतीनिमित्त वि. स. खांडेकर लिखित 'माणसाला पंख असतात' या १९६१ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचे सादरीकरण व विवेचन शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामध्ये झाले. यावेळी खांडेकर यांच्या कन्या मंगलताई पेंढारकर, जावई कर्नल पेंढारकर, डॉ. राजन गवस, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. एन. जे. बनसोडे, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 JAN 2017

सकाळ

# एनएसएस समन्वयकांसाठी कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या आणि संवादशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालय एनएसएस समन्वयकांसाठी २४ व २५ जानेवारीला कार्यशाळा होणार आहे. सामाजिक हिंसा आणि शोषण विषयावर कार्यशाळा होईल. बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे, यूनिसेफ महाराष्ट्रच्या संवाद तज्ज्ञ स्वाती मोहपात्रा, डॉ. सुधा कांकरिया, साधना झाडबुके, अनुराधा भोसले, पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभागप्रमुख डॉ. निशा पवार आदी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी एन. एस. एस. समन्वयकांना पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 JAN 2017

लोकमत

# खेळाने विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विकास

## पी. टी. गायकवाड : चाटे समूहाचे क्रीडा क्षेत्रातही यश

कोल्हापूर : खेळामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विकास होतो. चाटे समूहाचे विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरही क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय यश मिळविले. ही बाब निश्चितच गौरवास्पद आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड यांनी केले.

हनुमंतराव चाटे स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सतर्फे आयोजित केलेल्या शालेय क्रीडा स्पर्धेतील पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी राष्ट्रीय कबड्डीपटू व प्रशिक्षक संभाजी पाटील म्हणाले, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू बनण्यासाठी शालेय जीवनातच कठोर परिश्रम घ्यावे लागतात. चाटे शिक्षण समूहाचे विभागीय संचालक भारत खराटे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्राचार्य बी. एस. वडगांवे, प्रा. सर्जेराव राऊत, प्रज्ञा गिरी, वसंत जाधवर, जे. के. सूर्यवंशी, उज्ज्वला गायकवाड, अशोक साबळे, समीर यादव, अनिल खैरे, आदी मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 JAN 2017

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ तिसऱ्या स्थानी

कोल्हापूर : भोपाळ येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठ संघास तिसऱ्या स्थानी समाधान मानावे लागले.

बरकतउल्ला विद्यापीठ, भोपाळ येथे झालेल्या या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघाने चार सामन्यांत धडाकेबाज खेळ करीत उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने उदयपूर विद्यापीठ संघास ५-१, सोलापूर विद्यापीठ संघास ७-०, पुणे विद्यापीठ संघास २-१, मुंबई विद्यापीठ संघास १-० व शेवटच्या सामन्यात जबलपूर संघावर मात करुन, सलग पाच सामने जिंकत अखिल भारतीय विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेचे तिकीट मिळविले. मात्र, या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत अन्य संघांकडून त्याला पराभूत व्हावे लागले. त्यामुळे संघास तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

14 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# Kolhapur varsity inaugurates new reverse osmosis plant

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** A reverse osmosis (RO) and bottling plant was inaugurated on the Shivaji University, Kolhapur (SUK) campus on Friday.

The Kolhapur Municipal Corporation (KMC) commissioner P Sivasankar inaugurated the 5,000 litre capacity RO plant.

Devanand Shinde, the vice-chancellor of SUK said, "Every living soul has an equal right over to clean and pure water and this thought is what lead us to set up this RO plant on campus. All entities involved in this project are worthy of praise as it is due to their contribution that the of project was completed in record time."

He added that, everyone, whether vice-chancellor or employee of the university, should get same quality of water to drink and this RO plant will make sure of that..

"The clean water from the RO plant will be used in the departments of the university, administrative department, guest house, canteen,



hostels, and for families living in the campus quarters, he said.

Vilas Nandavadekar, the registrar of SUK said, "The plant can purify water at the speed of 5,000 litre per hour and it has been set up with the help of the university's self-funding. Apart from the purification, a semi-automatic bottling plant too has been set up here, which will ensure everyone gets clean water."

Sivasankar on the occasion said, "This is an important step for the university. It will now be self-sufficient in terms of the clean and pure water. Clean water is a universal right and it will prove quite important for the university."

Praising the university for its contribution he said, "Events like Jalyukta vidyapith, plantation drive, Swachh Bharat, Voting awareness or even the Beti Bachao, have been successfully launched by the university and this shows their contribution in the social areas."